**<u>ठळक बातम्या</u>**

- दावोसमध्ये राज्याचे ३७ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार, ४२ लाख रोजगारनिर्मिती शक्यता

- शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त राज्य सरकार विविध कल्याणकारी योजना राबवणार

- महाराष्ट्र सदन घोटाळ्यात छगन भुजबळ PMLA न्यायालयाकडून दोषमुक्त

- चांदीचा दर १८ हजार रुपयांनी वधारला, सेन्सेक्स ७७० अंकांनी घसरुन ८२ हजारांच्या खाली, निफ्टी २५ हजारांच्या उंबरठ्यावर

**आणि**

- रणजी करंडकात हैदराबाद विरुद्धच्या सामन्यात, सर्फराज खानच्या द्विशतकाच्या जोरावर मुंबई भक्कम स्थितीत

**<><><><><>**

दावोसमध्ये झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेच्या बैठकीतून राज्यात ३७ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले आहेत. त्यातून ४० ते ४२ लाख रोजगारांची निर्मिती होईल, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली.

दावोसमध्ये एकूण ५१ करार झाले असून, त्यापैकी साडे १६ लाख कोटी रुपयांचे करार उद्योग क्षेत्रातले आहेत. MMRDA अंतर्गत २४ करार झाले असून किंमत सुमारे साडे २९ लाख कोटी रुपये आहे अशी माहिती त्यांनी दिली.

दावोसमधून येणाऱ्या गुंतवणुकीपैकी सर्वाधिक २३ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक मुंबई महानगर क्षेत्रात येणार आहे. त्यानंतर कोकणात ३ लाख कोटी रुपयांहून अधिक, नागपूरमध्ये सुमारे २ लाख कोटी, नाशिकमध्ये ३० हजार १००

कोटी, छत्रपती संभाजीनगरमध्ये १७ हजार ७०० कोटी, पुण्यात सव्वा ३ हजार कोटी आणि अमरावतीत १,००० कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असल्याचं उद्योगमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

शिवसेना प्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त राज्यात विविध कल्याणकारी योजना राबवण्यात येणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. बाळासाहेब ठाकरे जयंतीनिमित्त आज मुंबईत आयोजित पत्रकारपरिषदेत ते बोलत होते.

**होल्ड व्हाइस कास्ट (१.१६ सेकंद)**

*(घरोघरी आरोग्य तपासणीची सुविधा देणारी आरोग्य आपल्या दारी मोहीम प्रथम मुंबईत आणि नंतर राज्यात इतरत्र राबवण्यात येईल असं त्यांनी सांगितलं. प्लास्टिक मुक्त गड किल्ले अभियान जागतिक वारसा यादीतल्या ११ किल्ल्यांवर आणि नंतर इतर किल्ल्यांवर चालवण्यात येणार आहे. त्यात सहभागी स्वयंसेवी संस्थांना १ लाख रुपये मानधन मिळेल. महिला बचत गट सक्षमीकरण, मराठी भाषा संवर्धन, रस्ता सुरक्षा, ज्येष्ठांसाठी एसटी संगे तीर्थाटन, या कामांसाठी प्रत्येकी १००कोटी रुपये तरतूद असेल.*

***होल्ड - एकनाथ शिंदे बाइट***

*या अंतर्गत राज्यातल्या शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी स्पर्धा घेऊन पहिल्या ३ शाळांना रोख पारितोषिकं दिली जाणार आहेत, अशी माहिती शिंदे यांनी दिली. झोपडपट्टी मुक्त मुंबई,तसंच आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न साकार करण्याकरता आपलं सरकार काम करील असं ते म्हणाले.)*

**<><><><><>**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त देशभरातून आदरांजली अर्पण करण्यात आली. बाळासाहेबांचं जनतेशी अनोखं नातं होतं,

विविध मुद्द्यांवर ते आपली मतं निडरपणे व्यक्त करत असत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह इतर मान्यवरांनी बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केलं आहे.

**<><><><>**

नवी दिल्लीतल्या महाराष्ट्र सदन कथित घोटाळ्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री छगन भुजबळ यांना मुंबईतल्या PMLA न्यायालयानं आज दोषमुक्त केलं. नवी दिल्लीत महाराष्ट्र सदन बांधण्यासाठी काढलेला मूळचा खर्चाचा अंदाज नंतर सुमारे चौपट वाढवल्याचा, आणि संबंधित कंत्राटदाराकडून लाच घेतल्याचा आरोप इडी, अर्थात सक्तवसूली महासंचालनालयानं ठेवला होता. २००५-६ मधल्या व्यवहाराचं हे प्रकरण आहे. भुजबळ त्यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री होते. याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं दाखल केलेल्या FIR च्या आधारावर ईडीनं, भुजबळ, त्यांचा मुलगा पंकज, आणि पुतण्या समीर, तसंच इतरांच्या विरोधात मनी लाँड्रिंग कायद्याअंतर्गत हा खटला दाखल केला होता. लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं दाखल केलेल्या विशेष खटल्यातून २००१ मधे या सर्वांची निर्दोष मुक्तता झाली आहे. आज भुजबळ यांचा दोषमुक्ततेसाठीचा अर्ज PMLA न्यायाधीश सत्यनारायण रामजीवन नवंदर यांनी स्विकारल्याचं वकिलानं सांगितलं.

**<><><><>**

नवी मुंबईतल्या प्रदूषण प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानं आज नवी मुंबईच्या आयुक्तांचा पगार रोखला. न्यायालयाच्या आदेशांचं उल्लंघन करणं आणि व्यक्तिगत शपथपत्र दाखल न करता शहर अभियंत्याला शपथपत्र दाखल करू दिल्याबद्दल न्यायालयानं ही कारवाई केली. पुढच्या आदेशापर्यंत आयुक्तांनी पगार घेऊ नये, असं मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती सुमन श्याम यांच्या खंडपीठानं सांगितलं.

बृहन्मुंबई महानगरपालिकेलाही न्यायालयानं फटकारलं. न्यायालयाच्या आदेशानंतरच महानगरपालिकेनं प्रदूषण कमी करण्यासाठी पावलं उचलली, तोपर्यंत ते काय करत होते, असं विचारून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांचा पगारही रोखू, असा इशारा न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी दिला.

<><><><><>

बदलापूरमध्ये एका लहान मुलीवर केलेल्या लैंगिक अत्याचारप्रकरणी आरोपीला पोलिसांनी आज कल्याणमधल्या न्यायालयात हजर केलं. न्यायालयानं त्याला येत्या २७ तारखेपर्यंत पोलीस रिमांड दिला आहे.

ही घटना संतापजनक आणि शरम वाटायला लावणारी असल्याची प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे. याप्रकरणावरुन त्यांनी फडनवीस यांना गृहमंत्रीपद सोडण्याचं आवाहन केलं आहे.

<><><><><>

मुंबईच्या सराफा बाजारात आज चांदी पुन्हा सुमारे १८ हजार रुपयांनी महाग झाली. त्यामुळं करांसह एक किलो चांदीसाठी ३ लाख २७ हजार रुपयांहून अधिक रक्कम मोजावी लागत होती. या तेजीमुळं चांदीच्या दरांमधली कालची १९ हजार रुपयांची घसरण भरुन निघाली. सोनं आज तोळ्यामागे सुमारे ३ हजार रुपयांनी महाग झालं. त्यामुळं एक तोळा २४ कॅरेट सोन्याचा दर १ लाख ५९ हजारांच्या पलीकडे आणि २२ कॅरेट सोन्याचा दर १ लाख ५५ हजार रुपयांच्या पलीकडे गेला होता.

शेअर बाजारातली कालची तेजी औट घटकेची ठरली आणि सेन्सेक्स पुन्हा ७७० अंकांनी घसरुन ८१ हजार ५३८ अंकांवर बंद झाला. निफ्टीमध्येही २४१ अंकांची घट झाली आणि हा निर्देशांक २५ हजार ४९ अंकांवर बंद झाला. डॉलरच्या तुलनेत रुपयानं आज ९२ रुपयांच्या पातळीला स्पर्श केला. तसंच गुंतवणूकदारांनी सर्वदूर विक्री केल्यानं शेअर बाजारात घसरण दिसून आली.

<><><><><>

केंद्र सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन वैयक्तिक पुरस्कारासाठी यंदा लेफ्टनंट कर्नल सीता अशोक शेळके यांची निवड झाली आहे. केरळमधे वायनाड इथं २०२४ मधे भूस्खलनामुळे ओढवलेल्या आपत्तीत शेळके यांनी अभियांत्रिकी कौशल्याच्या सहाय्यानं बचाव कार्यात लक्षणीय योगदान दिलं होतं. मूळच्या अहिल्यानगरच्या सीता शेळके भारतीय सैन्याच्या मद्रास अभियांत्रिकी आस्थापनेत कार्यरत आहेत.

<><><><><>

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या हौतात्म्य सत्संग वर्षाचं औचित्य साधून, आज नांदेडच्या पवित्र तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब इथे एका भव्य आणि विशेष कीर्तन सोहळा पार पडला. नांदेडच्या मोदी मैदानावर उद्या आणि परवा दोन दिवस हौतात्म्य सत्संग सोहळा होणार आहे. गृहमंत्री अमित शहा यांच्यासह देशातल्या अनेक राज्यांचे मुख्यमंत्री तसंच अनेक मान्यवर या सोहळ्यासाठी नांदेड इथं येणार आहेत.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात ड गटात इथं सुरु असलेल्या हैदराबादविरुद्धच्या सामन्यात, आज दुसऱ्या दिवशी, सर्फराज खानच्या द्विशतकी खेळीच्या बळावर मुंबईनं आपली बाजू भक्कम केली. कालच्या ४ बाद ३३२ धावांवरुन आज पुढचा खेळ सुरु झाल्यावर सर्फराज खाननं द्विशतक पूर्ण केलं. २२९ चेंडूत २२७ धावा करताना त्यानं १९ चौकार आणि ९ षटकार ठोकले. त्यामुळे मुंबईला पहिल्या डावात ५६० धावांचा डोंगर उभा करता आला.

दिवस अखेर हैदराबादच्या २ बाद १३८ धावा झाल्या होत्या.

ब गटात पुण्यात सुरु असलेल्या सामन्यात आज दिवसअखेर महाराष्ट्रानं गोव्यावर ९७ धावांची आघाडी घेतली. आजचा खेळ थांबला तेव्हा महाराष्ट्राच्या ८ बाद ३०६ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला दूसरा सामना आज रायपूर इथं होणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना भारतानं जिंकला आहे.  सामना संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या एका षटकात बिन बाद १८ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**